## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करणे व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करण्याबाबत विधान परिषद ठराव - १५६ मांडला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठाची माहिती संचालनालयास कळविण्याबाबत मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्र.एनजीसी/२०१६/विपठ१५६/मवि-१/८३७३, दि.१४ जुलै, २०१६ पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने एन.सी.सी. / एम.सी.सी. चा अभ्यासक्रम ज्या-ज्या महाविद्यालयांमध्ये सुरू आहे त्यांनी सदर अभ्यासक्रमाबाबतची माहिती विद्यापीठ कार्यालयास तात्काळ कळवावी. तसेच, ज्या महाविद्यालयांमध्ये सदरचा अभ्यासक्रम सुरू नाही त्या महाविद्यालयांनी "निरंक " अहवाल कळवावा. सुलभ संदर्भासाठी मा.शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे उपरोक्त संदर्भिय पत्र सोबत जोडले आहे.

आदेशान्वये,
I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 91
दि. 12 AUG 2016

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dirhe.org E-Mail : dirhe@pn2.Vsnl.net.in
फोन नं.020/26122119, 26051512, 26130627, 26124639 फॅक्स नं.020/26111153

क्र.एनजीसी/२०१६/विपठ१५६/मवि-१ | ८३६३ दि. JUL 2016

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विदयापीठे

विषय - **विधान परिषद ठराव --- १५६**
राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविदयालयीन विदयार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व शाळा आणि महाविदयालयात एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा, महाविदयालयात त्याचे शिक्षण सर्व विदयार्थ्यांना अनिवार्य करण्याबाबत

संदर्भ - शासन पत्र क्र विपठ २०१६/प्रक्र.३८०/विशि-३ दि.७/७/२०१६

श्री रामनाथ मोते, वि.प.स. यांनी एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करणे व प्रत्येक शाळा, महाविदयालयात त्याचे शिक्षण सर्व विदयार्थ्यांना अनिवार्य करण्याबाबत ठराव माडला आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने आपल्या विदयापीठाची माहिती संचालनालयास mavi.dhepune@gov.in या ईमेल वर **दि.१५/७/२०१६** पर्यंत सादर करावी.

( डॉ. वि. रा. मोरे )
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीसाठी

D:\E Driver\Nanded\Sankirn11.doc